# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

## कोव्हिड-१९ प्रतिबंध अंतर्गत कंत्राटी भरती जाहिरात

### -: थेट मुलाखत (Walk in Interview) :-

कोरोना विषाणूचा (COVID-19) प्रादुर्भाव रोखण्याच्या पार्श्वभूमीवर क.डों.म.पा.च्या रुग्णालयीन सेवेसाठी वाढीव मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने ''वैद्यकीय अधिकारी (पेडियाट्रिक)/ बालरोगतज्ज्ञ'' म्हणून साथरोग कालावधीसाठी पात्र उमेदवारांची निव्वळ तात्पुरत्या/ अस्थायी स्वरूपात कंत्राटी पद्धतीने नेमणूक करण्याकामी **दि. ०५.०८.२०२१** रोजी थेट मुलाखती आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

| पदनाम | पदसंख्या (आरक्षण) | शैक्षणिक अर्हता व अनुभव | दरमहा एकत्रित मानधन |
|---|---|---|---|
| **वैद्यकीय अधिकारी (पेडियाट्रिक)/ बालरोगतज्ज्ञ** | **एकूण ८ पदे** अनु. जाती- १, अनु. जमाती-१, वि.जा.(अ)-१, इ.मा.व.-१, ईडब्ल्यूएस-१, खुला-३ | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (बालरोग चिकित्साशास्त्र) पदव्युत्तर पदवी **किंवा** पदव्युत्तर पदविकाधारक (D.C.H.) समकक्ष पदवी, आणि<br>ब) शासकीय/ निमशासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्था/ खासगी रुग्णालयातील संबंधित विषयातील कामकाजाचा २ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | रु. ८५,०००/- |

(अ) मुलाखतीचे ठिकाण : आयुक्त कार्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, शंकरराव चौक, कल्याण (प.).

(ब) थेट मुलाखतीचा दिनांक : दि. ०५.०८.२०२१ (गुरुवार).

(क) उमेदवारांची नोंदणी आणि मूळ कागदपत्रे छाननी व तपासणी : सकाळी ११.०० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत.

(ड) थेट मुलाखतीची वेळ : दुपारी ०२.३० ते सायंकाळी ०५.३० या वेळेत पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील.

(**टीप :** रिक्त पदसंख्येपेक्षा कमी पात्र उमेदवार उपलब्ध झाल्यास आवश्यकता विचारात घेऊन मुलाखती न घेता नियुक्ती देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, तसेच आरक्षणनिहाय उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षित पदासाठी इतर प्रवर्गातील उमेदवाराचा विचार करण्यात येईल.)

उपरोक्तप्रमाणे सविस्तर जाहिरात व अर्जाचा नमुना **www.kdmc.gov.in** या वेबसाइटवर प्रसिद्ध आहे.

जा.क्र.कडोंमपा/जसंवि/मुका/३३९
दि. २६.०७.२०२१

स्वाक्षरी/-
**(डॉ. विजय सूर्यवंशी)** भा.प्र.से.
**आयुक्त,**
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.